आपले नेहरू

साने गुरुजी

साने गुरुजी जन्मशताब्दी अभियान माला

आपले नेहरू

साने गुरुजी

साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

आपले नेहरू

© साधना ट्रस्ट

आवृत्ती दहावी :
पू. साने गुरुजी जन्मशताब्दी
२४ डिसेंबर १९९८

मुद्रक, प्रकाशक :
ग. प्र. प्रधान
साधना
४३१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ आणि चित्रसजावट :
शेखर गोडबोले आणि राजू देशपांडे

किंमत : १५ रुपये

नगर वाचनालय सातारा.
बाळ विभाग

आपले नेहरू

"मी जिवंत असता माझ्या मोटारचा राष्ट्रीय झेंडा कोण काढतो मला पाहू दे." असे जळजळीत शब्द मोटारीतून खाली उतरून तो निर्भय पुरुष बोलला. पोलिस बघतच राहिले ! संस्थानी हद्दीतून महापुरुष तिरंगी झेंडा लावलेली मोटार घेऊन गेला. त्या डोळ्यांत सूर्याचे तेज होते. वाणीत वज्राचा निश्चय होता. कोण बरे तो महापुरुष ? तुम्ही ओळखलेत ? होय. आपल्या धीरगंभीर वाणीने, दिलदारीने, मोकळेपणाने, ध्येयनिष्ठेने, साधेपणाने जगातल्या सर्व प्रमुख राष्ट्रांतील जनतेला ज्याने वेध नि वेड लावले, साऱ्या जगाच्या आशाआकांक्षांचे जो केंद्र बनला, त्या पंडित जवाहरलाल नेहरूंचेच ते उद्‌गार !

त्यांचे सारे जीवनच निर्धाराने अनेक आपत्तींना नमवून पुढे जाण्याचे. प्रतापी पित्याचा हा प्रतापी पुत्र होता. मोतीलाल नेहरू म्हणजे केवढी धिप्पाड मूर्ती ! पू. विनोबाजी एकदा म्हणाले, ' देशासाठी फकिरी पत्करलेले मोतीलाल वर्धेच्या आश्रमात आले होते. त्या भव्य पुरुषाकडे पाहून मी भक्तीने साष्टांग प्रणाम केला." ही भव्यता नेहरू-कुटुंब का काश्मीरातून घेऊन आले ? हिमालयाची उत्तुंग शिखरे, केशराचे बगीचे, ठायी ठायी नद्या नि कालवे, गालिचांचे धंदे, सुंदर फुले नि फळे, सुंदर माणसे-भारताचा जणू स्वर्गच असे जे काश्मीर तेथचे हे मूळचे नेहरू घराणे. काश्मीरच्या कोणा राजाने कालव्यासाठी जमीन दिली म्हणून यांना नेहरू नाव पडले. नहर म्हणजे कालवा. नहरचे नेहरू झाले. मूळचे आडनाव कौल होते. पुढे वाडवडील काश्मीर सोडून आग्र्याकडे आले. आणि पहिल्या नंबराने

वकिलीची परीक्षा पास झालेले मोतीलाल अलाहाबादला जाऊन वकिली करू लागले. झपाट्याने पुढे आले. अपार पैसा मिळू लागला.

१८८९ मधील १४ नोव्हेंबर ही तारीख. त्या दिवशी माता स्वरूपराणी बाळंत झाली. बाळ जवाहर जन्मला. आई जशी लाखात सुंदर, तसाच हा बाळ सुंदर. हुबेहूब आईची ती प्रतिमा. नाव जवाहरलाल ठेवण्यात आले. सुंदर नाव, आणि पुढे सार्थ झाले. भारताचे ते वैभव ठरले. भारताची ते खरी संपत्ती होते.

घरात आप्तेष्टांची मुलेबाळे होती. त्यांच्यामध्ये बाळ वाढू लागला. हसू-खेळू लागला. घरात मावशी होती-जवाहरलालजींच्या आईची वडील बहीण. बाळपणीच ती विधवा झालेली. धाकट्या बहिणीला तिनेच वाढवले. तिचा संसार थाटण्यासाठी तिच्याकडे ती येऊन राहिली होती. या मावशीला दीदीअम्मा म्हणत. तीच भाच्याला खेळवायची.

हा गोरागोमटा बाळ मोठा होऊ लागला. नक्षत्रासारखा सुंदर, नागाच्या पिलाप्रमाणे तल्लख, हरणाप्रमाणे चपळ, पाखराप्रमाणे आनंदी असा हा मुलगा होता. घोड्यावर बसायला शिकला. पोहण्यात पटाईत झाला. नाना खेळ खेळे. रामलीला बघायला जाई. वडिलांचे पंतोजी मुनशी मुबारक अली यांच्या जवळ बसून गोष्टी ऐके. मनातले सारे तो मुन्शीजींजवळ सांगायचा. ईद वगैरे सणावारी मुन्शीजी बर्फी, मेवामिठाई त्याला पाठवायचे.

मार बसला

परंतु एकदा जवाहरला वडिलांच्या हातचा असा म्हणता खाऊ मिळाला की, त्याची गोड आठवण सदैव राहिली ! लहान मुलांना साऱ्याचा सोस. त्यांना हे हवे, ते हवे. वडिलांच्या टेबलावर दोन झरण्या (फाउंटनपेन्स) होत्या. त्यांतील एक बाळ जवाहरने घेतली. पुढे मोतीलाल शोधू लागले. झरणी सापडेना. पित्याने कठोरपणे

... विभाग

पुढे मोतीलाल शोधू लागले. झरणी सापडेना. पित्याने कठोरपणे पुत्राला हाक मारली. झरणी घेतलीस का, म्हणून विचारले. घाबरलेला बाळ 'नाही' म्हणाला. मोतीलाल लाल झाले. संतापाने त्यांनी पुन्हा विचारले नि जवाहरने कबूल केले. मग काय विचारता ? वेताची छडी घेऊन ते जवाहरला मारीत सुटले. माता रडत उभी होती. शेवटी तिने त्याची मुक्तता केली. आई बाळाला घेऊन गेली. तिने अमृताच्या हाताने मलम लावले. अंगावर जाड वळ उठले होते. पित्याच्या मारण्यातही अमृतच होते. ते मारणेही तारणेच होते.

आनंद भवन

जवाहर त्या वेळेस १० वर्षांचा होता. मोतीलालजींनी तेव्हा आनंद भवन राजवाडा विकत घेतला. अनेक फेरफार तेथे करण्यात आले. कृत्रिम धबधबे, कृत्रिम कैलास पर्वत. आणि तेथे एक शंकराची जटाधारी मूर्ती होती. तिच्या मस्तकातून गंगा वाहण्याची युक्ती केलेली होती. सभोवती अनेकरंगी व नानागंधी फुलांचे ताटवे. दुसऱ्या बाजूला अनेक घोडे, शिकारी कुत्रे. राजाचे वैभव तिथे होते.

पवित्र जागा

आनंद भवनाची जागा पवित्र होती. वनवासी रामाला भरत ज्या ठिकाणी भेटला होता ती ही जागा. जवळच भारद्वाज ऋषींचा प्राचीन काळी आश्रम होता. तेथे पूर्वकाळी एक मोठे विद्यापीठ होते. अजून दरसाल तेथे मोठी यात्रा भरते. हजारो लोक येतात आणि पाखरे वडावर बसावी त्याप्रमाणे आनंदभवनाचा आश्रय घेतात.

अशी ही पुण्यपावन प्राचीन जागा. तेथे राहील त्याला वनवास भोगावा लागेल, शत्रूंशी, संकटांशी झुंजावे लागेल, असे का ती जागा सांगत होती ? परंतु वनवासानंतर वैभवही नाही का मिळणार ? महात्माजींनी साबरमतीला आश्रम स्थापला तीही जागा अशीच.

प्राचीन काळी तेथे दधीची ऋषींचा आश्रम होता. दधीचींनी इंद्राला स्वत:ची हाडे वज्र करण्यासाठी दिली. पवित्र अस्थींच्या त्या वज्राने इंद्राने शत्रूंचा नि:पात केला. दधीचींप्रमाणे गांधीजींनीही राष्ट्रासाठी, मानवासाठी हाडे तिळतिळ झिजविली आणि गोळ्या मारणाऱ्यासही प्रणाम करून शेवटची पूर्णाहुती दिली; प्रेमाचा अमर संदेश दिला. आनंद भवनाची व महात्माजींच्या आश्रमाची जागा मनात येऊन माझ्या मनात कितीदा तरी गंभीर विचार येतात. व्यक्तीच्या व राष्ट्राच्या जीवन-वस्त्रात कसे कोठून धागेदोरे विणले जात असतील त्याची कल्पना कोण करू शकेल ?

अनेक शिक्षक

जवाहरलालांना शिक्षण देण्यासाठी निरनिराळ्या विषयांतील तज्ज्ञ शिक्षक मोतीलालांनी नेमले. कोणी इंग्रजी शिकवी, कोणी गणित; कोणी इतिहास, कोणी शास्त्र. जवाहरलाल त्यामुळे अनेक शास्त्रपारंगत झाले. सुंदर सुंदर शेकडो कविता त्यांना पाठ असत. मुंबईला आपल्या बहिणीकडे कधी आले म्हणजे सुंदर कविता वाचून दाखवायचे, म्हणून दाखवायचे. ते फार सुंदर रीतीने काव्य वाचत, म्हणत, तन्मय होत. त्यांच्या आत्मचरित्रात अनेक ठिकाणी अशा सुंदर सुंदर इंग्रजी कविता आहेत.

विलायतेस प्रयाण

वयाच्या चौदाव्या वर्षी जवाहरलालांना विलायतेत हॅरो येथे शिकण्यासाठी ठेवण्यात आले. आईबाप स्वत: त्याला घेऊन गेले होते. त्याची नीट व्यवस्था लावून ते परत आले. दोन वर्षे हॅरोला काढून पुढे जवाहरलाल केंब्रिजला गेले. शास्त्र विषय घेऊन ते पदवीधर झाले. १९०८ मध्ये ते हिंदुस्थानात परत आले. मग पुन्हा गेले. बॅरिस्टरीचा त्यांनी अभ्यास केला. इतरही शेकडो ग्रंथ वाचले. त्यांना सर्व

प्रकारच्या वाचनाची आवड. पुढे एकदा अटक झाल्यावर लहान बहीण कृष्णा हिला पत्रात त्यांनी लिहिले :

"तुझा आज वाढदिवस, नि मला अटक झाली. मी तुला सुंदर भेट देणार होतो. तुझा भाऊ जरा विसरभोळा आहे. परंतु लहान बहिणीची त्याला नेहमी आठवण येते. हे बघ, आता असे कर. एखाद्या पुस्तकांच्या दुकानात जा. आणि प्राचीन ज्ञानभांडाराची, मध्य युगातील श्रद्धेची, अर्वाचीन संशयवादाची आणि भावी नवयुगांची सुंदर सुंदर पुस्तके विकत घे व भावाची लाडक्या बहिणीला भेट समज. ती पुस्तके वाच. त्यांतून एक जादूचे शहर निर्माण कर. तेथे नकोत दुःखे, नकोत कष्ट. परंतु असे हे शहर बांधायला अविरत झगडावे लागते."

या पत्रावरून जवाहरलालांची दृष्टी तिन्ही काळांत कशी वावरत असे ते दिसते. भूतकाळातील जे जे भव्य त्यातून स्फूर्ती घेऊन भविष्याचा नकाशा डोळ्यांसमोर ठेवून वर्तमानकाळात क्षणाची विश्रांती न घेता ते झगडत.

मायभूमीला परत

१९१२ मध्ये जवाहरलाल शिक्षण संपवून परत आले. घरची मंडळी सारी मसूरीला होती. आज जवाहर येणार होता. घरात आनंद, धावपळ. आईची उत्कंठा तर असीम होती. दोन लहान बहिणी पाखराप्रमाणे वाट बघत होत्या. एक बहीण बारा वर्षाची, दुसरी पाच वर्षाची. १९०८ मध्ये जवाहरलाल विलायतेहून येऊन परत गेले तेव्हा ती लहान होती. आज ती भावाला बघणार होती. मोठया बहिणीचे नाव सरूप आणि या धाकटीचे नाव कृष्णा. घोड्यांच्या टापा ऐकू आल्या. मंडळी बाहेर आली. घोड्यावरून तरुण जवाहर खाली उतरला. त्याने छोट्या बहिणीला एकदम उचलून घेतले.

"बरीच मोठी झालीस की ! चांगली बाई शोभतेस !" असे तिचा

 / साने गुरुजी

पापा घेऊन वडील भाऊ म्हणाला. बहीण गोंधळली, बावरली. जवाहरलालने तिला खाली ठेवले. आपल्या भावाकडे ती प्रेमाने, भीतीने बघत होती.

पुढे सारी मंडळी अलाहाबादला आली. जवाहरलाल पुढे काय करणार ? पित्याचीच गादी पुढे चालवणार का ? इंग्लंडमध्ये राहून ते आले होते. स्वातंत्र्याच्या कल्पना घेऊन आले होते. लहानपणापासून गोऱ्यांची त्यांना चीड येई. विशेषतः इंग्रजांची. इंग्रजांचा पराभव व्हावा असे तेव्हा ९-१० वर्षांच्या या मुलाला वाटे. रशियाचे व जपानचे युद्ध १९०४-५ मध्ये सुरू झाले. रशियाचा पराभव व्हावा ही तीव्र भावना लहानपणापासून त्यांच्या मनात असे. हिंदुस्थानातील कोट्यवधी मुलांत हीच भावना असे. इतिहासाच्या पुस्तकातील इंग्रजांची चित्रे विद्रूप करायची, 'देव राजाचे रक्षण करो', असे वाक्य असे. त्यात 'न' घालायचा, असे त्या वेळेचे वातावरण होते.

जवाहरलाल इंग्लंडमध्ये शिकत होते तेव्हा भारतात वंगभंगाची चळवळ भडकली, बॉंब पडू लागले, लोकमान्यांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली. इंग्लंडात, युरोपात अनेक हिंदी देशभक्त धडपडत होते. जवाहरलाल त्यात ओढले गेले नाहीत तरी त्यांच्या मनावर त्याचा परिणाम झाला असेलच. ते स्वदेशात आले नि लौकरच पहिले महायुद्ध सुरू झाले. लोकमान्य टिळक सुटले. ते पुन्हा कॉंग्रेसमध्ये आले. १९०७ मध्ये लोकमान्य अलाहाबादला गेले. तेव्हा केणीही मोठा पुढारी त्यांच्या स्वागतासाठी स्टेशनवर गेला नाही, हजारो विद्यार्थी मात्र गेले, त्यांत नरेन्द्र देव होते. टिळक सुटून आले नि होमरूलची चळवळ त्यांनी सुरू केली. नरेंद्र देव होमरूल लीगचे सेक्रेटरी झाले.

विवाह

देशाच्या स्वातंत्र्ययुद्धाशी लग्न लागण्याआधी त्यांचे १९१६ मध्ये कमलेशी लग्न लागले. दिल्लीचा तो लग्नसोहळा अपूर्व होता. अलाहाबादला आनंद भवनात आधीपासून किती दिवस तयारी ! शिंपी, जवाहिऱ्ये, सराफ, सर्वांची सारखी जा-ये. ती पाहा अलाहाबादहून शृंगारलेली खास लगीनगाडी सुटली. गोतावळा, ते विराट वऱ्हाड दिल्लीला आले. किती तरी बंगले भाड्याने घेतले तरी अपुरे पडले. शेवटी तंबू ठोकले. कमला नि जवाहर यांचा जोडा शोभत होता. कमला अति सुंदर होती. तिच्या तोंडावरची अल्लड कोवळीक ती पुढे मोठी झाली तरीही होती. संसार सुरू झाला. कशाला तोटा नव्हता. कुबेरासारखे वैभव, घरी गजान्त लक्ष्मी, प्रेमळ मायबाप, प्रेमळ बहिणी, सुंदर पत्नी, विद्या, तारुण्य,-सारे होते. १९१७ साली मुलगी इंदिरा जन्मली. 'इन्दिरा प्रियदर्शिनी' असे तिला सारे म्हणत. सुंदर आईबापांची सुंदर मुलगी. जीवन असे जात होते, तरी अजून जीवनाला अर्थ नव्हता प्राप्त झाला. आणि क्रांतीचा क्षण आला.

महात्माजी

महात्माजी १९१४ अखेर दक्षिण आफ्रिकेतून मायभूमीला परत आले. तिकडे यशस्वी केलेले सत्याग्रहाचे अमर शस्त्र घेऊन आले. आफ्रिकेतून निघताना अनुयायांना ते म्हणाले : ''मरणाची पर्वा न करणारे कार्यकर्ते असल्याशिवाय कुठले स्वराज्य ? आपण सत्याग्रहाचे शस्त्र घेऊन जाऊ, प्राण हातात घेऊन जाऊ.'' चंपारण्य, खेडा जिल्हा येथे हे नवे प्रयोग सुरू झाले. बनारस हिंदू युनिव्हर्सिटीत गांधीजींनी जे जळजळीत भाषण केले, ते का जवाहरलालांच्या कानांवर गेले नसेल ? त्याच्यावर आनंदभवनात का चर्चा झाल्या नसतील ? महात्माजी वाट बघत होते.

अधीर जवाहर

१९१८ मध्ये पहिले महायुद्ध थांबले. हिंदुस्थानला स्वयंनिर्णयाचा हक्क द्या असे सांगण्यासाठी राष्ट्रसभेचे शिष्टमंडळ विलायतला गेले. लो. टिळकही गेले होते. मध्यंतरी काय सुधारणा देता येतील ते बघायला मॉंटेग्युसाहेब या देशात येऊन गेले होते. परंतु सुधारणा देणे दूरच राहिले; रौलेट कायदा भारताच्या डोक्यावर बसला ! संशयावरून वाटेल तेव्हा पकडण्याचा या बिलाने पोलिसांस अधिकार देण्यात आला होता. महात्माजी साबरमतीच्या तीरावरून म्हणाले : ''मानवाची ही विटंबना आहे. साऱ्या राष्ट्राने बिलाचा निषेध करावा.''

एप्रिल १९१९ चे ते दिवस. प्रार्थना, हरताळ, उपवास, सभा असा तो कार्यक्रम होता. सारे राष्ट्र नवतेजाने उभे राहिले. निःशस्त्र जनतेला मार्ग मिळाला. दिल्लीला गोळीबार झाले. गुरख्याच्या बंदुकीसमोर श्रद्धानंदांनी छाती उघडी केली व म्हटले : ''चलाव तेरी गोली.' तिकडे पंजाबात जालियनवाला बागेत सभेला हजारो लोक जमलेले. त्यांच्यावर दारूगोळा संपेपर्यंत गोळ्या झाडण्यात आल्या. शेकडो मेले. लष्करी कायद्याचा धिंगाणा सुरू झाला. त्या वेळेस मोतीलालजी, देशबंधू दास पंजाबात चौकशीसाठी गेले. मदत करायला जवाहरलालही गेले. गांधीजीही आले. सरकारने साऱ्या प्रकारावर सारवासारव केली. गंगेच्या तीरावर राष्ट्रसभेचे नेते जमले. स्वातंत्र्य-प्राप्तीपर्यंत झगडत राहायचा त्यांनी निर्धार केला. परंतु कसे झगडायचे ? असहकार व कायदेभंग हाच एक मार्ग होता. जवाहरलाल तो मार्ग घ्यायला अधीर झाले. मोतीलालांच्या मनाची कालवाकालव होत होती. आजवर जीवन सुखात गेलेले. गांधीजींचा मार्ग म्हणजे सतीचे वाण. पितापुत्रांचे रात्ररात्र वाद होत. कधीकधी रागाने शब्दाशब्दी होई. बहिणींना चिंता वाटे. आईचा कंठ दाटे. हृदय फाटे. पितापुत्रांची मतभेदाने ताटातूट होणार का ?

महात्माजी एकेक मोहरा मिळवीत चालले. लोकमान्य देवाघरी गेले

होते. महात्माजी म्हणाले, ''आता एक क्षणभरही लोकमान्यांचे निशाण खाली ठेवता येणार नाही.'' मोतीलाल व देशबंधू या दोन भीमार्जुनांची जोड मिळावी म्हणून गांधीजींची पराकाष्ठा. मोतीलालजींचा फोटो पाहून ते एकदा म्हणाले, ' केवढ्या पुरुषाशी मला झगडायचे आहे ! ही हनुवटी, हे डोळे. अपार निश्चयी असा हा पुरुष आहे. याला जिंकून घेणे कठीण आहे.'' परंतु महात्माजींनी मोतीलालांना जिंकले. गांधीजींच्या मार्गाने जायला ते तयार झाले. पितापुत्र समरस झाले, पुन्हा मोकळेपणा आला.

आनंदभवनात क्रांती झाली. ते आवडते घोडे, त्या घोड्यांच्या गाड्या, घरातील ते उंची सामान, त्या कलात्मक वस्तू, सुंदर भांडी नाना देशांतून आणलेली-सारे विकण्यात आले. आचारी, बटलर, अनेक नोकर-चाकर यांना प्रेमाने निरोप देण्यात आला. घरात साधेपणा आला. जुने बडे बडे स्नेही येईनासे झाले. आता देशासाठी तळमळणाऱ्या खादीधारी लोकांची जा-ये सुरू झाली. गांधीजींनी राष्ट्राच्या विचारात, आचारात, पेहरावात क्रांती केली. ते नवदर्शन होते. जवाहरलाल म्हणत : ''माझ्यासमोर जीवनाचा स्वच्छ मार्ग नव्हता. अंधार होता. महात्माजींनी प्रकाश दिला. त्यांच्यामुळे जीवनाचा अर्थ मला कळू लागला, का जगावे ते कळू लागले.''

पहिला तुरुंगवास

त्या वेळेस ब्रिटिश राजपुत्र भारतात यायचे होते. राष्ट्रसभेने त्यांच्या स्वागतावर बहिष्कार घातला. मोतीलाल व जवाहरलाल यांना अटक करायला अधिकारी आले. आनंदभवनात पोलिस घुसले. घरातील नोकर संतापले. जवाहरलालजींच्या आईने नोकरांना शान्त केले. पितापुत्रांना अटक झाली. खटला सुरू झाला. सरकारी वकील मोतीलालजींचा मित्र. तो त्यांच्याकडे बघायला लाजत होता. सहा महिने सक्तमजुरी व ५०० रुपये दंड अशी शिक्षा देण्यात आली !

दंडासाठी घरातील वाटेल ते मौल्यवान सामान नेण्यात आले. सरकारने दीड महिन्यानेच सोडले, परंतु जवाहरलालांना पुन्हा लगेच शिक्षा झाली. तुरुंगात जाणे येणे आता नित्याचे झाले.

आजारी पडले

जवाहरलाल कधी आजारी पडत नसत. 'माझी प्रकृती पोलादी आहे' असे ते अभिमानाने म्हणत. ते एकदाच आजारी पडले. नाभा संस्थानात जुलूम चालला होता. पंडितजी तिकडे जाऊन आले. परंतु त्या हवेतून ते विषमाचा ताप घेऊन आले. ताप हटेना. सर्वांच्या तोंडचे पाणी पळाले. परंतु एके दिवशी ताप निघाला. सर्वांचा जीव भांड्यात पडला. १९२३ मधील त्या आजारानंतर ते फारसे कधी आजारी पडले नव्हते. तुरुंगात असोत वा बाहेर, ते नियमित व्यायाम घेत. मोजके खात.

युरोपात हवापालट

लढ्याची पहिली लाट ओसरली होती. पहिली उसळी मंदावली होती. कमला अति उत्साही, ज्वालेप्रमाणे तेजस्वी, परंतु तिची मूळची नाजुक प्रकृती या सुमारास बरीच खालावली. जवाहरलाल त्या वेळेस आपल्याच ध्येयसृष्टीत वावरत. ते संयुक्तप्रांतातील किसानांत भटकत होते, हजारो खेड्यांतून हिंडत होते, पायी जात होते; त्यांना कमलेची जणू आठवण नव्हती ! कमलाही त्यांच्यासंगे हिंडली असती, वणवण करती. परंतु ती स्वाभिमानी होती. आपण होऊन ती काय म्हणून सांगेल ? जवाहरलालांना कमलेचे हृदय, तिच्या आकांक्षा त्या वेळेस कळल्या नाहीत.

कमलाच्या प्रकृतीसाठी जवाहर तिला व छोट्या इंदिरेला घेऊन युरोपला निघाले. पुढे छोटी बहीण कृष्णाही तिकडे गेली. जिनीव्हा हे आंतरराष्ट्रीय भेटीगाठीचे स्थान. तेथे ही मंडळी राहिली. स्वित्झर्लंड

सृष्टिसौंदर्याचे माहेरघर. जवाहर म्हणजे निसर्गाचे बाळ. पर्वतांवर चढावे, दऱ्यांतून उतरावे, विमानांतून उंच आकाशात जावे, समुद्रात डुंबावे, बर्फावरून घसरावे, फुले-पाखरे बघावी, आकाशातील रंग बघावे, तारे निरीक्षावे, ही सारी त्यांना हौस. एकदा बर्फावर घसरायला मंडळी गेली होती. जवाहरलालांना कोणाचा धक्का लागला-नि चालले खाली घसरत. उजवीकडे प्रचंड कडा होता. मोठ्या प्रयासाने घसरता घसरता ते कुशीवर वळले. थोड्या वितींच्या अंतराने खोल दरीत न पडता दगडांशी जाऊन अडकले. आणि भारताचा महान पुत्र वाचला. पाचदहा सेकंदांचा अवधी ! परंतु युगाप्रमाणे वाटला. रात्री एका शेतकऱ्याकडे मग जेवले, झोपले.

व्यापक दृष्टीचे शिक्षक

ते बहीण कृष्णा हिला म्हणाले : ''हा जिनीव्हाचा नकाशा घे. हे ट्रामचं वेळापत्रक. ही तिकिटांची कुपनं. जा हिंड, फीर. हा इंग्लिश-फ्रेंच शब्दकोश घे.'' तिने फ्रेंच शिकावे म्हणून एकदा रागावले. प्रत्येकाने काही शिकावे, वेळ फुकट दवडू नये, परावलंबी नसावे, असे त्यांना फार वाटे. बरेच सामान घेऊन मंडळी चालत जात होती. कृष्णा म्हणाली : ''पाय थकले. मोटर कर ना रे भाई !'' भाई म्हणाला : ''मोटर केली तर मग रात्री नाटकाला नाही जायचं. काय पाहिजे, बोला !'' नाटकाचा आनंद गमावण्याऐवजी सगळ्यांनी पायी जायचे कबूल केले.

उन्हाळ्यात युरोपातील अनेक विद्यार्थी जिनीव्हाला जमतात. तो महान मेळावा असतो. हिंदी, चिनी, सिलोनी, अमेरिकन, फ्रेंच, जर्मन, - सारे तेथे जमायचे. जवाहरलाल त्यांच्यांत मिसळायचे. प्रख्यात फ्रेंच साहित्यिक रोमाँ रोलाँ यांनाही ते मधून मधून भेटत. घरी कृष्णा स्वयंपाकपाणी करी. जवाहरलाही मदत करायचे. कृष्णाला शिकवायचे : ''तू फार सुखात वाढलीस. काम करीत जा. श्रम करीत

जा. सुखासीन जीवनाने व्यक्तिमत्त्वाचा विकास नाही होत.'' अनेक क्रांतिकारक भेटायला यायचे. धनगोपाल, वीरेन्द्र चट्टोपाध्याय यायचे, थोडावेळ राहायचे, जायचे. जवाहरलाल इटलीतही नेपल्स वगैरे पाहून आले. पॅरिसला अनेक फेऱ्या व्हायच्या.

ब्रूसेल्स येथे साम्राज्यविरोधी संघाची स्थापना करण्यात येत होती. जवाहरलालांना हिंदचे प्रतिनिधी म्हणून आमंत्रण देण्यात आले. ते गेले. आजच्या इंडोनेशियाचे पुढारी त्या वेळेस प्रथमच जवाहरलालांना भेटले. थोड्या दिवसांनी मोतीलालही युरोपात गेले. १९२७ मध्ये रशियन क्रांतीच्या १०व्या वार्षिक दिनाला मॉस्कोहून पिता-पुत्रांना आमंत्रण आले. मंडळी तिकडे गेली. जवाहरलाल बरेच बघून आले. १९२७ च्या डिसेंबरात कोलंबोला सारी मंडळी गेली. मद्रासला १९२८ मध्ये कॉंग्रेसचे अधिवेशन होते. ते आटोपून आनंदभवनात हे प्रवासी पुन्हा आले.

स्वातंत्र्याचा ठराव

१९२८ च्या डिसेंबरात कलकत्ता कॉंग्रेस भरली. मोतीलालजी अध्यक्ष होते. वसाहतीच्या स्वराज्याचा ठराव तेथे मंजूर झाला. जवाहरलालांचा विरोध होता. महात्माजी म्हणाले : ''सरकारला एक वर्षाची मुदत देऊ. नाही तर स्वातंत्र्याचा ठराव करू व त्या साठी लढा देऊ.'' एक वर्ष हां हां म्हणता गेले. देशभर युवक चळवळी उभ्या राहिल्या. उत्तर प्रदेशातील युवक चळवळीचे पंडितजी अध्यक्ष होते. अखिल भारतीय कामगार चळवळीचेही ते अध्यक्ष झाले. १९२९ ची लाहोर कॉंग्रेस आली. जवाहरलालांचे नाव अध्यक्ष म्हणून उत्तर प्रदेशने सुचविले. गांधीजींनी ते उचलून धरले. त्यांनी लिहिले : ''तो स्फटिकाप्रमाणे निर्मळ आहे. शूर आहे. त्याचा उतावीळपणाही त्याला शोभतो. राष्ट्र त्याच्या हातात सुरक्षित आहे.'' लाहोरची कॉंग्रेस भरली. महात्माजींनी दिलेली वर्षाची मुदत संपली होती. ३१ डिसेंबर

१९२९ रोजी स्वातंत्र्याचा ठराव मंजूर झाला. रावी नदीच्या तीरावर रात्री बारा वाजता जवाहरलालांनी स्वातंत्र्याची प्रतिज्ञा सांगितली; लाखोंनी ती उच्चारली. २६ जानेवारी हा स्वातंत्र्यदिन म्हणून पाळण्याचा देशभर आदेश गेला.

नगर वाचनालय सातारा. बाल विभाग

१९३० साल उजाडले

स्वातंत्र्याचा ठराव झाला. पुढे काय ? महात्माजी स्वस्थ नव्हते. त्यांनी व्हाइसरॉयकडे त्या ऐतिहासिक अकरा मागण्या धाडल्या. दोन ओळींचा नकार आला ! गांधीजी म्हणाले : "भाकर मागितली, मिळाले दगड !" १९३० च्या १२ मार्चला महात्माजी दांडीयात्रेला बाहेर पडले. म्हणाले : "आधी मी सत्याग्रह करीन, मग सारे करा." आणि त्याप्रमाणे झाले.

सारे राष्ट्र जणू उठले. सर्वत्र लाठीमार, गोळीबार. जवाहरलालांना अटक झली. जूनमध्ये मोतीलालांनाही झाली. परंतु आजारीपणामुळे त्यांची सुटका करण्यात आली. ते मसुरीला जाऊन राहिले. इतक्यात जवाहरही सुटले. मुलाला भेटायला पिता येत होता. जवाहर स्टेशनवर होता. गाडीला उशीर झाला. तिकडे सभेला जवाहरलालजींना जायचे होते. शेवटी ते गेले. पिता स्टेशनवर उतरला तो समोर पुत्र नव्हता ! घरी ते मुलाची वाट पाहात होते. परंतु तिकडेच त्याला अटक झाल्याची वार्ता आली. क्षणभर मोतीलाल खिन्न झाले. परंतु म्हणाले : "अत:पर औषधे नकोत. माझा आजार गेला. मलाही काम करू दे."

2 3
45910
बा वि. 7-1990
3-752

मोतीलाल गेले

परंतु प्रकृती सुधारेना. १९३१ च्या जानेवारीत जवाहर सुटला, तो घरी येऊन सरळ पित्याच्या खोलीत गेला. पिता-पुत्रांनी मिठी मारली. मग मोकळा होऊन पुत्र अंथरुणावर बसला. अखेर अश्रू आलेच

मुलगा भेटला म्हणून मोतीलालांचे मुख फुलले होते. जवाहरलालांच्या डोळ्यांत करुण वेदना होती. येरवड्याहून गांधीजी सुटले. तेही तडक अलाहाबादला आले. मोतीलालांना ४ फेब्रुवारीस लखनौस नेण्यात आले. ५ तारखेस रात्री प्रकृती अधिकच बिघडली. पत्नीला म्हणाले : ''मी पुढे जातो. तुझी वाट बघेन.'' कृष्णा रडू लागली. तिला जवळ घेऊन म्हणाले : ''माझ्या छोट्या मुलीने शूर असले पाहिजे.'' गांधीजींना म्हणाले : ''मी स्वराज्य पाहायला नाही; परंतु तुम्ही ते आणलेच आहे.'' मुखावर शांती पसरली. गायत्री मंत्राचा जप करीत हा पुण्यप्रतापी पुरुष ६ फेब्रुवारी १९३१ ला पहाटे देवाघरी गेला !

असा भाऊ कुठे मिळेल ?

गांधीजी दिल्लीला वाटाघाटीसाठी गेले. दुःख गिळून जवाहरही गेले. आयर्विनबरोबर तडजोड झाली. कराचीला राष्ट्रसभेचे अधिवेशन होते. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांना सरकारने फाशी दिले. त्या घटनांचा अनिष्ट परिणाम त्यांच्या मनावर जाला होता. कराचीला मूलभूत मानवी हक्कांचा ठराव पास झाला. गांधीजी लंडनला निघाले. नेहरू घरी थोडी व्यवस्था लावीत बसले. त्यांनी लहान बहिणीला लिहिले :'' घर व जे काही आहे ते तुझे व आईचे. मी विश्वस्त म्हणून सारे पाहीन. मला व माझ्या कुटुंबाला फारसे लागणार नाही. आपण नीट राहू.'' बहीण कृष्णा 'ना खंत ना खेद' या पुस्तकात लिहिते : ''असा भाऊ कुठे मिळेल ?''

आई दुःखी होती. पतीच्या आधी आपण भरल्या कपाळाने, भरल्या हातांनी जाऊ, असे तिला वाटे. परंतु उलटे झाले. वेळ मिळे तेव्हा मातृभक्त जवाहरलाल आईजवळ बसून तिचे दुःख हलके करायचे.

पुन्हा तुरुंग

गांधीजी शिष्टाई विफल होऊन परत आले. ते मुंबईला उतरले. नवे व्हाइसरॉय विलिंग्डन यांना त्यांनी भेटीची मागणी करणाऱ्या तारा केल्या. नकार आला. जवाहरलालांना आधीच अटक झाली होती. महात्माजींनाही अटक झाली. देशभर वणवा भडकला. माता स्वरूपराणी २६ जानेवारीच्या स्वातंत्र्यदिनाच्या विराट सभेच्या अध्यक्षा झाल्या. लाठीमार झाला. सार्जंट हाणीत सुटले. नेहरूंच्या आईच्या डोक्यावर लाठी बसली. तुरुंगात ती वार्ता ऐकून जवाहरलाल बेचैन झाले. म्हणाले : ''मी बाहेर असतो तर माझी अहिंसा कसोटीस लागली असती !'' १९२८ मध्ये सायमन कमिशनवरच्या बहिष्काराच्या वेळेस लखनौला जवाहरलालांनी डोक्यावर घाव घेतले होते. परंतु हा आईवर प्रहार होता. सारे नेहरू कुटुंब अग्निपरीक्षेतून जात होते.

नगर वाचनालय सातारा.
बाल विभाग

कमला

कमला आजारी होती. आई काळजी घेत होती. पुढे चळवळ ओसरली. हरिजनांसाठी महात्माजींचे उपवास झाले. जवाहर सुटले. कमलेजवळ थोडा वेळ बसून ते तडक बिहारमध्ये गेले. तेथे भीषण भूकंप झालेला. नेहरू आले नि कुदळफावडे घेऊन ढिगारे खणू लागले, प्रेते बाहेर काढू लागले. दहा दिवस त्यांनी अपार श्रम केले. दहा दिवसांनी ते अलाहाबादला आले नि बारा तास झोपले ! जाग आली का, कमला हळूच येऊन पाही. बरा तासांनंतर जाग आली. म्हणाले : ''किती झोपलो !'' कमलाबरोबर, आईबरोबर बोलत चहा घेत होते. तो कलकत्याला केलेल्या भाषणाबद्दल वॉरंट आले. पुन्हा खटला, शिक्षा नि तुरुंग. तुरुंग त्यांचे दुसरे घरच झाले होते. एका पत्रात ते लिहितात : ''इथे मनाची शान्ती आहे. वाचीन, मनन करीन, अधिक शहाणा होऊन बाहेर येईन.''

दुसऱ्या एका पत्रात लिहितात : ''डेहराडूनचा हा तुरुंग.

बर्फाच्छादित शिखरे दिसत आहेत. मेघांनी गाशा गुंडाळला आहे. निळे निळे गंभीर आकाश दिसत आहे. हे निळे आकाश किती आश्चर्यकारक, कसे वेड लावणारे ! हे निळे आकाश दिसावे म्हणून का अभ्रे गेली ? आता सायंकाळ झाली आहे. सूर्याचे किरण पकडून लहान-मोठे ढग त्यांना चौफेर फेकीत आहेत. अनंत आकृती, क्षणात बदलणाऱ्या. आणि रंगांची धिंगामस्ती. काही वेळाने चन्द्रही आला. जवळजवळ पूर्णचंद्र. विविधतेत आणखी भर.''

ग्रंथवाचनात रमणारा, सृष्टीचे वेड असलेला, त्याला तुरुंग का कंटाळवाणा वाटेल ? परंतु प्रियजन दूर असतात. प्रत्यक्ष कार्य करता येत नाही; हेच शल्य असते. जवाहरलालांनी इंदिरेला विश्वोतिहासावर पत्रे लिहिली. ती प्रसिद्ध झाली आहेत. जणू इंदिरेचे निमित्त करून भारतीय मुलांसाठी ते लिहीत होते. पुढे आत्मचरित्र लिहायला घेतले. इकडे कमला अधिकच खंगत चालली. मधून मधून तिला भेटायला ते येत. चार दिवस संपताच पुन्हा तुरुंगात जात. कमलेला शेवटी युरोपात पाठवायचे ठरले. तिला भेटायला तुरुंगातून ते दोन दिवस घरी आले. तिला निरोप देऊन जड मनाने ते पुन्हा तुरुंगात गेले.

कमलेची प्रकृती तिकडे सुधारेना. जवाहरलालांची सुटका करण्यात आली. विमानाने ते युरोपात पत्नीजवळ गेले. स्वित्झर्लंडमध्ये लॉसेन येथे ती होती. जवाहर तिच्याजवळ बसायचे, बोलायचे, वाचून दाखवायचे, फुले आणून द्यायचे. पत्नीचा आत्मा त्यांना या वेळेस समजला. परंतु १८ फेब्रुवारी १९३६ या दिवशी कमला कायमची देहरूपाने तरी गेली ! शून्य मनाने विमानाने ते भारताकडे येत होते. वाटेत बसऱ्याहून इंग्लंडमधील प्रकाशकांना त्यांनी 'नसलेल्या कमलेला' ही आत्मचरित्राला अर्पणपत्रिका पाठवली. त्या दोन शब्दांत सारे विश्व होते. इंदिरेचे १९३८ मध्ये फिरोज गांधींशी लग्न लागले. त्या वेळेस कन्यादान करताना पंडितजींनी एक रिकामा पाट कमलेसाठी शेजारी मांडला होता. थोरांची थोर मने !

कर्मवीरांना रडायला वेळ नसतो. जीवन पुढे जात असते. १९३६ च्या वादळी उन्हाळ्यात लखनौ कॉंग्रेसला नेहरूंनाच अध्यक्ष करण्यात आले. फैजपूरच्या ग्रामीण अधिवेशनाला तेच अध्यक्ष, हजारो शेतकरी मायबहिणी दुतर्फा पाहून मिरवणुकीच्या रथातून खाली उतरून नमस्कार करीत ते पायी जाऊ लागले. झेंड्याची दोरी तुटली तेव्हा ती वर पुन्हा नेणाऱ्या खानदेशच्या इंद्रसिंगाला हृदयाशी धरून त्यांनी शंभर रुपये दिले !

नगर वाचनालय सातारा.
बाल विभाग

मंत्रिमंडळ

पुढे देशभर निवडणुका होत्या. नेहरू देशभर हिंडले. विमाने, मोटरी, बैलगाड्या, उंट, घोडे, - सारी वाहने त्यांनी वापरली. पायीही चालले. एकदा रानात मोटरचे पाणी संपले तर रात्री पाणी बघत हिंडले. निवडणुकांत यश मिळाले. मंत्रिमंडळे घ्यायची की नाही यावर वर्धेस खडाजंगी झाली. जवाहरलाल अति संतापले. जमनालालजींनी त्यांना मोटरीतून हिंडवून शान्त करून आणले. देशी मंत्र्यांची राजवट सुरू झाली. जवाहरलालांना त्यात फारसा रस नव्हता.

आई नि मावशी गेल्या

दोघा बहिणींची मध्यंतरी लग्ने झाली होती. स्वरूपाचे तर वडील असतानाच अपूर्व थाटाने रणजित पंडित यांच्याशी झाले. कृष्णाचे वडिलांच्या मरणानंतर राजा हाथीसिंग यांच्याशी झाले परंतु मध्यंतरी १९३८ मध्ये आई एकाएकी सोडून गेली. रात्री मुलांजवळ माता बोलत होती;- तो वाताचा जटका आला तोच अखेरचा. आणि आई मरून २४ तास झाले नाहीत तोच या लहान बहिणीचा संसार थाटण्यासाठी आलेली बीबीअम्मा-तिचाही प्राण निघून गेला. जणू बहीण हेच तिचे जीवन होते !

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

प्रवास करून आले

नेहरू प्रवासाला निघाले. मध्यंतरी ब्रह्मदेश, जावा इकडे ते जाऊन आलेच होते. आता पुन्हा युरोपात गेले. जणू काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून सर्वत्र बोलले. म्हणाले : ''हिंदुस्थानात ब्रिटिश राजवटीत आम्ही फॅसिझमच रोज अनुभवीत आहोत ! ''स्पेनमधील यादवी युद्धातील विमानहल्लेही अनुभवून आले. चेकोस्लोव्हाकियातील स्कोडा वगैरे कारखाने बघते झाले. स्वदेशी परतले व चीनकडे गेले. तो दुसरे महायुद्ध भडकले.

चले जाव

चीनमधून ते तत्काळ कलकत्त्याला आले. तेथे काँग्रेस कार्यकारिणी भरली. सरकारने युद्धहेतु जाहीर करावे अशी राष्ट्रसभेने मागणी केली. पुढे 'राष्ट्रीय सरकार आज द्याल तर युद्धात सशस्त्र मदत करू'असाही ठराव केला. परंतु सरकार रेसभर पुढे येईना. तेव्हा गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. जवाहरलालना एका भाषणासाठी आधीच अटक होऊन गोरखपूरच्या न्यायाधीशाने ''तुम्हांला चांगली अद्दल घडेल अशी शिक्षा देतो'' असे म्हणून चार वर्षांची सजा दिली ! पंडितजी म्हणाले : ''मी कितीदा नि किती वर्षे तुरुंगात होतो याचा हिशोब करीत नसतो. माझ्यासमोर दरिद्री जनता असते !''

परिस्थिती झपाट्याने बदलत होती. जपान युद्धात सामील होऊन भराभरा प्रदेश जिंकीत ब्रह्मदेशापर्यंत आला. भारताचे काय ? काँग्रेसचे सारे सत्याग्रही सुटले. क्रिप्स वाटाघाटीसाठी आले, परंतु काही निष्पन्न न झाल्यामुळे परत गेले; आणि राष्ट्रपित्याने तो ऐतिहासिक 'चले जाव !' शब्द उच्चारला. त्यांनी पंडितजींना आपला दृष्टिकोन पटवला. नेहरू म्हणाले : ''गांधीजींच्या डोळ्यांत केवढी उत्सुकता होती !'' मुंबईस १९४२मध्ये ऑगस्टच्या ८ तारखेस रात्री

नगर वाचनालय सातारा
बाळ विभाग

'चले जाव' ठराव मंजूर झाला. 'करेंगे या मरेंगे' हा संदेश राष्ट्रपित्याने दिला.

नेहरू रात्री १२ वाजता दमून निजले होते. मोठ्या पहाटे पोलीस आले. ९ ऑगस्टला नगरच्या किल्ल्यात बंदिस्त झाले. देशभर उग्र संग्राम चालला होता. सरकार आहे-नाही असे झाले. तिकडे नेताजींची आझाद फौज लढत होती. 'चलो दिल्ली', 'जय हिंद' हे नवशब्द जन्मले. जवाहर तुरुंगात भारताचा भूतकाळ अभ्यासीत होते, भविष्याचा नकाशा आखीत होते. हे प्राचीन राष्ट्र का टिकले ? नाना धर्म, संस्कृती, जाती-जमाती यांच्या लाटा आल्या. परंतु भारत समन्वय करीत त्यांतून पुनःपुन्हा पुढे जाई. भारताचा नवनवोन्मेषशाली आत्मा त्यांना सापडला.

हिटलरचा पाडाव झाला. ॲटम बॉंबने जपान शरण आला. नेताजी कोठे गेले ? प्रभूला माहीत. महात्माजी सुटले व पुढे इतर राष्ट्रनेते सुटले. निवडणुका झाल्या. दिल्लीला कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांचे संमिश्र सरकार स्थापण्यात आले. परंतु जीनांना चिरफाडच हवी होती. त्यांनी १९४६ चा १६ योजनेनुसार कलकत्ता शहरात कत्तली-जाळपोळी घडवल्या. नौखालीत तर सीमा नव्हती. महात्माजी दीनांचे अश्रू पुसायला तिकडे गेले तो बिहारमध्ये सूड भडकला. जवाहरलाल तेथे धावले व म्हणाले : ''दुसरे पशू झाले तरी तुम्ही होऊ नका.'' पाकिस्तान न मिळेल तर असे होत राहील हे जिनांना दाखवायचे होते. शेवटी फाळणी होऊन स्वातंत्र्य आले !

१५ ऑगस्ट

१९४७ मधील १५ ऑगस्ट उजाडला. ब्रिटिश गेले. युगानुयुगांचे ग्रहण सुटले. लाल किल्ल्यावर अशोकचक्रांकित तिरंगी ध्वज फडकला. देशाचा काही भाग गेला तरी उरलेला एवढा मोठा भाग एका सत्तेखाली कधी होता ? ती सत्ता पुन्हा ना एका राजाची, धर्माची वा प्रांताची.

साऱ्या जनतेची सत्ता. अपूर्व अशी ती वस्तू होती.

गांधीजी गेले

परंतु फाळणीनेही शान्ती नाही आली. हिंदू, शीख ठेवायचे नाहीत असे जणू पाकिस्तानने ठरवले. निर्वासितांचे लोंढे येऊ लागले. इकडचे तिकडे जाऊ लागले. अश्रू व रक्त यांची किमत स्वातंत्र्यासाठी जनता देत होती. गांधीजी सर्वांना शान्त करीत होते. कलकत्त्यात उपवास करून त्यांनी शान्ती आणली. ते दिल्लीत आले तो तेथेही ज्वाळा भडकलेल्या. काश्मीरवरही पाकिस्तानी आक्रमण. नेहरूंनी फौजा पाठवल्या. गांधीजी काय म्हणतील - त्यांच्या मनात येई, परंतु गांधीजींनी आशीर्वाद दिला. एकदा आघाडीरून येताना नेहरूंनी गांधोजींसाठी सुंदर काश्मिरी फुले आणली. प्रार्थना-प्रवचनात बापूंनी त्या फुलांचा उल्लेख केला. परंतु दिल्ली शान्त नव्हती. राष्ट्रपित्याने उपवास आरंभला. 'मरो गांधी' कोणी ओरडला. नेहरू ताड्कन् मोटरीतून उतरून म्हणाले " तुम्हांला असे बोलवते कसे ? आधी मला मारा. " एकाने गांधींवर बॉंबही फेकला. मरण जणू जवळ येत होते. १९४८ ची ३० जानेवारी तारीख आली. शुक्रवार. सायंकाळचे ५।। वाजलेले. जरा उशीर झाला म्हणून गांधीजी झपझप जात होते. तो कोणी नमस्कार करण्याच्या निमित्ताने पुढे आला व गोळ्या झाडता झाला. मारणाऱ्याला प्रणाम करून 'हे राम !' म्हणून महात्मा परमात्म्यात विलीन झाला !

गांधीजींचे संदेशवाहक

त्या रात्री सकंप आवाजात नेहरू राष्ट्राला म्हणाले : "सभोवती अंधार आहे-परंतु नाही ! तो प्रकाश आहे. गांधीजींनी दिलेला प्रकाश या देशाला, मानवजातीला हजारो वर्षं पुरेल." सरदार व नेहरू अश्रू पुसून उभे राहिले. राष्ट्राला त्यांनी धीर दिला. " हे राष्ट्र सर्व

धर्मासाठी आहे. ज्यांना ज्यांना इथे प्रामाणिकपणे रहायचे आहे त्या सर्वांसाठी आहे '' अशी नेहरूंनी घोषणा केली.

महात्माजी म्हणायचे : ''जवाहर माझा वारस !'' जवाहरलाल सर्वांना सांभाळून नेत होते. राष्ट्रकुलात राहिले तरी बंधने स्वीकारली नाहीत. ते भारताच्या स्वातंत्र्याचेच कैवारी होते असे नाही, तर जे जे गुलाम त्या सर्वांचे ते कैवारी होते. इंडोनेशियाला साम्राज्यवाले डच स्वातंत्र्य देत ना, तर गांधीजी असतानाच १९ आशियाई राष्ट्रांची त्यांनी परिषद बोलावली. आणि डच हे सत्ता सोडून गेले. नेहरूंच्या धीरोदात्त नीतीचाच तो विजय होता.

लय सातारा
बाळ विभाग

अमेरिकेचा दौरा

भारताचा हा सुपुत्र स्वतंत्र भारताचा पंतप्रधान देशोदेशी जाऊ लागला. किती मनमोकळे तेथील त्यांचे बोलणे-चालणे ! म्हणाले : ''भारत तटस्थ राहील.'' अमेरिकेत असताना त्यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या मुख्य कचेरीला भेट दिली. कॅनडातही ते जाऊन आले.

भारताची लोकशाही घटना

६ डिसेंबर १९४६ रोजी स्वतंत्र भारताची लोकशाही घटना तयार करण्यास सुरुवात झाली. घटनेचा मूलभूत व मार्गदर्शक ठराव नेहरूंनीच मांडला. त्या ठरावाप्रमाणे घटना तयार करण्याचे काम वेगाने चालू होते. २६ नोव्हेंबर १९४९ ला ते महान कार्य पूर्ण झाले. १९५० च्या २६ जानेवारीला ती लोकशाही घटना देशभर लागू झाली.

या नव्या घटनेप्रमाणे १९५२ मध्ये सबंध भारतभर प्रौढ मतदान पद्धतीने निवडणुका झाल्या. नेहरूंच्या पुण्यप्रतापाने कॉंग्रेस सर्व प्रांतांत यशस्वी झाली. सर्व प्रांतांत कॉंग्रेसची मंत्रिमंडळे स्थापन झाली. केंद्रीय

सरकारात नेहरू पुन्हा पंतप्रधान झाले.

नवरचना

नेहरूंनी यानंतर पंचवार्षिक योजनेच्या कामात लक्ष घातले. योजनेच्या कामासाठी देशभर ते गेले. सिंद्रीचा खताचा कारखाना, चित्तरंजनचा रेल्वे इंजिनांचा कारखाना, विझगापट्टमची जहाजे बांधण्याची प्रचंड गोदी, ही सर्व ठिकाणे त्यांनी निवडली. या ठिकाणांना ते नव्या भारताची तीर्थस्थाने म्हणत. भारतीय तरुणांनी अशा ठिकाणी जाऊन आपल्या देशात चाललेली प्रगती प्रत्यक्ष पाहावी असा त्यांचा आग्रह असे. भाक्रा नानगल, दामोदर, तुंगभद्रा या धरणांचे कामही त्यांनी अनेकदा प्रत्यक्ष जाऊन पाहिले होते. ते नेहमी म्हणत : ''आपण देशात ज्या गोष्टी करू, त्या उत्तमच असल्या पाहिजेत असा माझा आग्रह आहे. दुसऱ्या-तिसऱ्या दर्जाचे हलके काम आपण करता कामा नये !'' असंख्य लोकांना काम देणाऱ्या त्या योजना भारताच्या भाग्यरेखा उजळीत आहेत.

एका खांबावरची द्वारका

१९५१, १९५३ व १९५४ या वर्षी नेहरू काँग्रेसचे अध्यक्ष होते. पंतप्रधानकी आणि काँग्रेसचे अध्यक्षपद या दोन अति मोठ्या जबाबदाऱ्या. नेहरू म्हणूनच इतके काम पेलू शकले. परंतु दिवसेंदिवस त्यांना वाटू लागले की, आपण नवीन तरुण माणसांना तयार केले पाहिजे. आपल्याला कितीही उत्साह असला, उमेद असली तरी देशाच्या दृष्टीने एकाच माणसावर अनेक कामे नकोत. एका खांबावरची द्वारका नको.

महाराष्ट्राचे गुण

१९५३ आणि १९५४ या दोन्ही वर्षी उत्तर हिंदुस्थानात सर्वत्र

जलप्रलयाने हाहाकार उडवला. कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. लक्षावधी लोक निराश्रित झाले. नेहरूंना दिल्लीत चैन पडेना. आपद्ग्रस्त जनतेची परिस्थिती समक्ष पाहून त्यावर उपाययोजना करण्यासाठी नेहरू स्वतः धावले. महाराष्ट्रातील दुष्काळाच्या वेळी, एप्रिल १९५३ मध्ये नेहरू महाराष्ट्रात आले. एप्रिल-मेचा महाराष्ट्रातला कडक उन्हाळा; पण त्यात नेहरूंनी संकटग्रस्त जनतेच्या भेटीसाठी दौरा काढला. दुष्काळी कामे पाहिली. लोकांना धीर दिला. त्यांचे सांत्वन केले. दौऱ्याच्या शेवटी ते म्हणाले : ''या दौऱ्यात मला जनतेच्या दुर्दम्य जीवनशक्तीचे दर्शन घडले. लोकांत क्रियाशीलता आहे; जडता नाही. संकटाला भिऊन, हताश होऊन, निष्क्रिय राहण्याची दीन व पराभूत वृत्ती मला महाराष्ट्रात कुठेच दिसली नाही. कणखरपणा, नम्रता व प्रेम हे तीन गुण मला महाराष्ट्रात आढळले.''

पंचशील

दिल्ली जणू जगाची राजधानी बनली. नाना देशांचे राजे, अध्यक्ष, पंतप्रधान, मंत्री वगैरे मोठमोठे लोक दिल्लीला येत. नेहरूंना भेटत व जागतिक शान्ततेच्या प्रश्नावर चर्चा करत. नेहरूंनी जागतिक शान्ततेसाठी एक नवा सिद्धान्त मांडला. राष्ट्रा-राष्ट्रांनी आपापसांत कसे वागावे याचे त्यांनी पाच नियम सांगितले आहेत. या पाच नियमांनाच 'पंचशील' असे म्हणतात. शील म्हणजे वर्तन किंवा वागण्याची पद्धत.

(१) प्रत्येक राष्ट्राने दुसऱ्याचे सार्वभौमत्व मान्य करावे.

(२) प्रत्येक राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा व प्रादेशिक एकात्मतेचा आदर राखावा.

(३) कोणत्याही राष्ट्राच्या अन्तर्गत कारभारात दुसऱ्या राष्ट्राने ढवळाढवळ करू नये.

(४) दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करू नये.

(५) सर्वांनी शान्ततापूर्ण सहजीवन उपभोगावे.

हे ते पाच नियम. या पाच नियमांचा सर्वांनी काटेकोर अवलंब केला की जागतिक शान्तता प्रस्थापित होण्यास किती वेळ लागेल ? या पंचशीलांना रशिया, चीन, ब्रह्मदेश इत्यादी अनेक राष्ट्रांनी पाठिंबा दिला. १८ एप्रिल १९५५ रोजी इंडोनेशियात बांडुंग येथे आशिया व आफ्रिका या खंडांतील २९ राष्ट्रांची परिषद भरली होती. ती परिषद भरवण्याला नेहरूंचेच परिश्रम कारणीभूत होते. या परिषदेत वसाहतवादाचा व साम्राज्यवादाचा धिक्कार करण्यात आला. अणुबॉंबचा वापर बड्या राष्ट्रांनी करू नये, सर्व परतंत्र राष्ट्रे स्वतंत्र व्हावीत, असे ठराव पास झाले. भारताच्या 'पंचशील' तत्त्वांचाच हा विजय होता. त्यांच्या या शान्तिकार्याबद्दल राष्ट्राध्यक्षांनी त्यांना 'भारतरत्न' ही सर्वोच्च मानाची पदवी अर्पण केली.

बाल-दिन

प्रत्येक वर्षी भारतात त्यांचा वाढदिवस १४ नोव्हेंबरला मोठ्या उत्साहाने साजरा होतो. विशेषतः लहान मुलांच्या उत्साहाला तर पारावारच राहात नाही. १९५४ चा त्यांचा वाढदिवस मुंबईला साने गुरुजी कथामालेच्या वतीने साजरा झाला. नेहरूकाका स्वतः या समारंभाला हजर होते. त्यामुळे तर मुलांना अत्यानंदच झला. १४ नोव्हेंबर हा आता देशभर बालदिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी मुलांचे कार्यक्रम होतात. मुलांसाठी खास समारंभ केले जातात. नेहरूकाकांना मुले फार आवडत.

नेहरूंना भूदानाबद्दल आस्था व कळकळ वाटे. विनोबांच्या बद्दल त्यांच्या मनात प्रेमादर होता. जेव्हा आवश्यक वाटेल तेव्हा आपली इतर कामे तात्पुरती बाजूला ठेवून नेहरू विनोबाजींच्या भेटीला जात. त्यांच्याशी देशातील नाना प्रश्नांवर विचारविनिमय करीत.

गोवा स्वतंत्र झाला

'मी जर पंतप्रधान नसतो तर खांद्यावर तिरंगी झेंडा घेऊन मी गोव्यात शिरलो असतो' असे ते म्हणाले होते. गोवा हा भारताचाच एक भाग आहे व तो भारतात विलीन होईल, याबद्दल त्यांना तिळमात्र शंका नव्हती. सैन्यबळावर गोव्याचा प्रश्न चुटकीसरसा सोडवता येईल इतकी भारताची शक्ती, पण हा प्रश्न सामोपचाराने, शांततेच्या मार्गाने सुटावा अशी नेहरूंची इच्छा होती. आपण जगाला शान्ततेचा उपदेश करीत असताना आपले प्रश्न सैन्यबळावर सोडवावे लागू नयेत, अशी त्यांची तीव्र इच्छा होती. परंतु सहनशीलता म्हणजे दुबळेपणा नव्हे. सामोपचाराचे सर्व मार्ग थकल्यावर अखेरीस त्यांना लष्करी कारवाईचा निर्णय अत्यंत व्यथित अंतःकरणाने प्राप्तकर्तव्य म्हणून घ्यावा लागला. भारताचे अविभाज्य अंग असलेला गोवा भारतात सामील झाला.

नगर वाचनालय सातारा.
बाळ विभाग

महाराष्ट्राचे घटक राज्य

ऑक्टोबर १९५५ मध्ये भाषावार प्रांतरचनेचा अहवाल प्रसिद्ध झाला. एवढा मोठा प्रचंड देश अनेक, भाषा, एकाच विभागावर अनेक लोकांचे हक्क इत्यादी गोष्टींमुळे सर्वांना संपूर्णपणे समाधान होईल असा निर्णय होणे अशक्यच ! देशाच्या ऐक्याला तडा जातो की काय, अशी भीती वाटू लागली. भाषावार राज्ये करताना सीमांच्या कटकटी सुरू झाल्या. मुंबईचा वाद मिटता मिटेना. द्विभाषिकाचा प्रयोग झाला. परंतु महाराष्ट्राने निवडणुकीत आपले मनोगत निःसंदिग्धपणे व्यक्त केले. शेवटी द्विभाषिक मोडून महाराष्ट्र व गुजरात अशी राज्ये निर्माण करण्याचे ठरले. लोकमत राज्यकर्त्यांनी मान्य केले. नव्या महाराष्ट्र राज्याची स्थापना पंडितजींच्या हस्ते समारंभपूर्वक झाली. नव्या राज्याला त्यांनी आशीर्वाद दिला.

विज्ञान व नियोजनाबद्दल प्रेम

भारताचा विकास नियोजनाशिवाय होणार नाही, हे स्वातंत्र्यापूर्वीच त्यांना जाणवले होते. त्यांच्या आग्रहामुळे तेव्हाच एक नियोजन समिती कॉंग्रेसने नेमली होती. भारत स्वतंत्र होताच नियोजनाच्या दिशेने पावले उचलली गेली. योजना आयोग नेमण्यात आला. पंडितजींना नियोजनाचा मोठा उत्साह. भारताला समाजवादाशिवाय तरणोपाय नाही, ही त्यांची धारणा. त्यांच्यामुळेच कॉंग्रेसने समाजवादी समाजरचनेचे ध्येय स्वीकारले आणि योजनेचेही ते उद्दिष्ट ठरले. विज्ञान आणि नियोजन यांविषयी त्यांना अपार प्रेम असे.

ते स्वतः विज्ञानाचे पदवीधर होते. भारतातील अंधश्रद्धा, रूढी आणि दुष्ट परंपरा यांची हकालपट्टी करायची तर वैज्ञानिक दृष्टीचा स्वीकार केला पाहिजे असे ते म्हणत. दरसाल वेळात वेळ काढून विज्ञान परिषदेला ते हजर राहात आणि वैज्ञानिकांना प्रोत्साहन देत. भारतातील तरुणांनी वैज्ञानिक क्षेत्रातही पुरुषार्थ गाजवावा असे त्यांना वाटे.

विज्ञानाने आज जी मजल गाठली आहे त्यामुळे ते वरदानही ठरू शकते किंवा शापही ठरू शकतो. जर शान्तता टिकली तरच जगाच्या ह्या थोर वारशाचा मानवाला उपयोग होऊ शकेल. विज्ञान व हिंसा ह्यांच्यात मेळ बसत नाही अशी त्यांची निष्ठा होती. त्यामुळेच राष्ट्रसंघामार्फत शान्ततेचे जे प्रयत्न चालतात त्यांत त्यांचे हार्दिक सहकार्य होते. अणूच्या शान्ततामय उपयोगासाठी भारतात जे कार्य चालू आहे त्या मागे त्यांचीच प्रेरणा होती.

गरिबांचे कैवारी

नेहरू श्रीमंतीत वाढले. स्वच्छ पोषाख करीत असले तरी त्यांना गरिबांची घृणा नाही. एकदा दिल्ली स्टेशनातील झाडूवाला दुरून त्यांच्याकडे बघत होता; तर ते त्याच्याकडे गेले व त्याला हृदयाशी

धरते झाले. अमेरिकेत एका गरीब मोटरड्रायव्हरच्या मोटरीतून गेले व त्याचा नि स्वतःचा त्यांनी फोटो काढवला. लांबून आलेल्या निग्रो मातेजवळ प्रेमाने हस्तांदोलन केले. एक अमेरिकन भगिनी म्हणाली, 'असा पुरुष आमच्या देशात जन्माला यायला हवा होता !'

मुलांचे प्रेम

मुलांवर त्यांचे फार प्रेम ! कितीही कामात असले तरी मुले काही विचारायला आली तर त्यांची शंका फेडीत. अमेरिकेतील मुलांना स्वाक्षरी देत उभे राहात. जपानी, अमेरिकन व रशियन मुलांना त्यांनी हत्ती पाठवले. जगातील मुलांचे ते मित्र होते.

उतावळा स्वभाव

त्यांना चोख काम हवे असे. अलाहाबाद म्युनिसिपालिटीचा कारभार २५ वर्षांपूर्वी त्यांनी किती उत्कृष्ट चालवला. त्यांना बावळटपणा सहन होत नसे. त्रिपुरी काँग्रेसच्या वेळेस झेंड्याच्या दोरीची गुंतागुंत पाहून म्हणाले : ''किसने किया ? कौन है जिम्मेदार यहाँ ? गोली मारो उसको !'' परंतु रागावले तरी ते लगेच शांत होत. महात्माजी म्हणाले : जवाहरलालांना उतावीळपणा शोभतो.''

पोहण्याचे भोक्ते

ते कधी कुठे अडायचे नाहीत. मध्यंतरी पेट्रोल कमी मिळे तर ते सायकलवरून जात-येत. घोडा तर त्यांचा प्यारा. लंडनला घोड्यावरून दौड करून आले. आणि मागे मुंबईला आले तर पहाटे चारलाच जुहूला जाऊन सागराच्या लाटांशी धिंगामस्ती करीत होते !

प्रेमळ जीवन

घरगुती जीवनात ते अति प्रेमळ होते. बहिणींचे वाढदिवस लक्षात

ठेवीत, पत्रे लिहीत, भेटी पाठवीत. त्यांची मुले खेळवीत. इंदिरेची मुले ही त्यांची करमणूक असे.

थोरांविषयी पूज्यभाव

गांधीजींविषयी त्यांना जे वाटे ते शब्दातीत आहे. राजघाटावर जात, तेथे बसून सूत कातीत. नेहरू अति बारीक सूत काढीत. आणि गुरुदेव रवीन्द्रनाथांविषयी त्यांना असाच अत्यंत आदर. मदनमोहन मालवीयांना भेटायला गेले तो मालवीयांचे डोळे भरून आले. नेहरू म्हणाले : 'रोनेका समय नहीं, खुशीका है !'' सुभाषबाबूंना राजीनामा द्यावा लागला तेव्हा नेहरू अति दुःखी झाले. खाजगी बोलताना म्हणाले : ''पृथ्वी दुभंग होऊन मला तिने पोटात घ्यावे असे वाटले.'' नेताजी आज नाहीत. जवाहरलालनी त्यांचा 'जय हिंद' शब्द उचलला. भाषणाच्या शेवटी जय हिंद म्हणत. आझाद सेनेच्या अधिकाऱ्यांच्या बचाव-समितीत त्यांनीही आपले नाव घातले व बॅरिस्टरीचा झगा घालून लाल किल्ल्यात गेले. असे पंडितजी होते. मोठेपणाला प्रणाम करणारे.

थोर ग्रंथकार

ते इंग्रजी अति सुंदर लिहीत. आत्मचरित्र इंग्लंडात प्रसिद्ध झाले तर तीनचार महिन्यांत आठ आवृत्त्या निघाल्या ! पुढे जगातील सर्व भाषांत ते गेले. 'जागतिक इतिहासाचे ओझरते दर्शन' (ग्लिम्प्सेस ऑफ वर्ल्ड हिस्ट्री) हे असेच सुंदर पुस्तक. आणि 'भारताचा शोध' (डिस्कव्हरी ऑफ इंडिया) तर जगभर गाजले. जगभर त्यांचे ग्रंथ गेले.

आपले पंडितजी असे होते. भारताचे ते भूषण होते. या देशात सुबत्ता यावी, ज्ञान यावे, विज्ञान यावे, सर्वांचा संसार सुंदर व्हावा, सर्वांना थोडी विश्रांती मिळावी; संस्कृतिसंवर्धनात सारी जनता भाग घेत आहे, जातपात, प्रांत, धर्म या भेदांच्या पलीकडे जाऊन सारे

सहानुभूतीने, प्रेमाने नांदत आहेत, रोगराई नाही, वाण नाही, नवी नवी क्षितिजे डोळ्यांसमोर आहेत, अविरत कर्म चालले आहे, कोणावर आक्रमण नाही, कोणाचे होऊ देणार नाही, नांदा आणि नांदवा-अशा दृष्टीचा, ध्येयवादी असा हा पुरुष होता.

काळाचे बोलावणे

२७ मे १९६४ हा दिवस भारताच्या इतिहासातील एक दुर्दैवी दिवस ठरला. या दिवशी पंडित जवाहरलाल नेहरू आपल्याला सोडून गेले. दिल्लीला त्या दिवशी एक हलकासा धरणीकंपही जाणवला. जणू पृथ्वीनेही त्यांच्या मृत्यूचे दुःख नोंदवले.

'माझ्या मृत्यूनंतर कोणतेही धार्मिक विधी करू नयेत' असे त्यांनी मृत्युपत्रात लिहून ठेवले होते. त्यांचे मृत्युपत्र वाचण्यासारखे आहे. आपल्या देहाची झालेली राख विमानांतून खूप उंचीवरून देशात पसरवून टाकावी, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली होती.

त्यांच्या मृत्यूचे वृत्त आकाशवाणीने देशाला दिले. सर्व देश शोकमग्न झाला. मरण्यापूर्वी पंडितजी थोडे आजारीच होते. 'त्यांच्यानंतर कोण ?' असा प्रश्न निर्माण झाला होता. 'तुम्हीच वारस नेमून ठेवा' असे लोक त्यांना सांगत, पण त्यांचा लोकशाहीवर अढळ विश्वास होता. 'भारतातील जनता सूज्ञ आहे. पंतप्रधान कोण, ते ती ठरवील.' असे ते म्हणत. आपल्या मागून आपली कन्या पंतप्रधान व्हावी व नेहरू घराण्याचे राज्य चालावे, अशी त्यांची इच्छा नव्हती. अशी व्यवस्था करणे पंडितजींना अशक्य नव्हते. ते इतके लोकप्रिय होते की त्यांचा शब्द त्यांच्या मृत्यूनंतरही भारतीय जनतेने मोडला नसता, परंतु ते निखालस लोकशाहीवादी होते. वारस नेमण्याची राजेशाही प्रथा त्यांना मान्य नव्हती. त्यांनाच 'तुमच्यानंतर कोण ?' असे पत्रकार विचारीत. 'मी इतक्या लौकर जात नाही,' असे ते उत्तर देत.

चीनशी लढाई

चिनी आक्रमणामुळे पंडितजी लौकर खचले. चीन आपला कधी विश्वासघात करील असे त्यांना स्वप्नातही वाटले नव्हते. आशियातील या दोन थोर राष्ट्रांत स्नेहसंबंध असावेत, अशी नेहरूंची मनापासून इच्छा होती. म्हणून त्यांनी चीनला भेटी दिल्या व भारतात चिनी पंतप्रधानाचे स्वागत केले. काही लोक सावधगिरीचा इशारा देत, पण पंडितजी तिकडे दुर्लक्ष करीत. परंतु ऑक्टोबर १९६२ मध्ये चीनने फार मोठ्या सैन्यानिशी आपल्या नेफा प्रदेशावर स्वारी केली. आपण जोरदार प्रतिकार केला, पण आपली ताकद कमी पडली. 'भारतावर हे युद्ध लादले गेले आहे आणि आपण त्याला धैर्यानिशी, सर्व सामर्थ्यानिशी कोठलीही भीती व द्वेष अंतःकरणात न ठेवता तोंड दिले पाहिजे' असे पंडितजींनी आवाहन केले. या युद्धाच्या वेळी सर्व जनता एकवटली होती. सर्व पक्षांनी पंडितजींना पूर्ण पाठिंबा दिला होता. संकटप्रसंगी आपसांतील मतभेद विसरून सर्व भारतीय कसे एक होतात, त्याचे अविस्मरणीय दृश्य जगाला दिसले.

थोड्याच दिवसांत चीनने माघार घेतली. चीनने केलेला विश्वासघात नेहरूंच्या मनाला लागला असावा. भुवनेश्वर येथे काँग्रेसच्या अधिवेशनात त्यांना आजारीपणामुळे भाषण अर्धवट सोडून खाली बसावे लागले.

त्यांनी लालबहादुर शास्त्रींना पुन्हा मंत्रिमंडळात बोलावून घेतले. 'आता मला मदतीची गरज आहे' असे ते शास्त्रीजींना म्हणाले. लालबहादुर शास्त्रींनी पंडितजींना शेवटपर्यंत साथ दिली. पंडितजींच्या निधनानंतर लालबहादुर शास्त्री भारताचे पंतप्रधान झाले. दुर्दैवाने त्यांनाही काळाने फार लौकर आपल्यातून ओढून नेले.

● ●

साने गुरुजींचे निवडक वाङ्मय

कुमार गटासाठी

१. सुंदर पत्रे (भाग १ ते ३)
२. बापूजींच्या गोड गोष्टी (भाग १ ते ६)
३. माझी दैवते
४. कुमारांपुढील कार्य
५. दिगंबर राय
६. जीवनाचे, शिल्पकार
७. भारतीय नारी
८. लोकमान्य टिळक
९. आपले नेहरू
१०. भगवान श्रीकृष्ण
११. कावळे
१२. मोरी गाय
१३. साक्षरतेच्या कथा
१४. दारुबंदीच्या कथा
१५. श्रीशिवराय
१६. सोनसाखळी
१७. शबरी
१८. सुंदर कथा
१९. मुलांसाठी फुले
२०. यज्ञ
२१. त्यागातील वैभव
२२. गोड गोष्टी भाग १ ते १० (संच)
२३. श्यामची आई
२४. चंद्रभागेच्या वाळवंटी
२५. मेघ चियांग / इतर गोष्टी
२६. विचारगाथा
२७. विश्वदर्शन
२८. विश्वभारती
२९. हिमालयातील शिखरे
३०. आव्हाने
३१. अमोल गोष्टी
३२. विश्राम
३३. गोप्या
३४. मिरी
३५. दुर्दैवी
३६. आपण सारे भाऊ
३७. स्वर्गीय ठेवा

मोठ्या गटासाठी

१. नवा प्रयोग
२. सती
३. क्रांती
४. तीन मुले
५. समाजधर्म
६. राष्ट्रीय हिंदुधर्म
७. स्त्री-जीवन
८. रामाचा शेला
९. भारतीय संस्कृती
१०. भारताचा शोध
११. नवजीवन
१२. स्वप्न आणि सत्य

साधना प्रकाशन

४३१ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०. फोन : ४४५१७२४